# महात्मा गांधींचे कालातीत शिक्षण विषयक विचार

**प्रा.विपीन नारायण वैराट** शंकरराव जगताप कॉलेज,वाघोली . ता.कोरेगाव जि. सातारा **.**

---

**प्रस्तावना :**आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या जोरावर मनुष्याने विविध सुख सोयी निर्माण केल्या. विज्ञानाने त्याला आणखी सामर्थ्यवान केले. पण हे घडत असताना समाजात अनेक गंभीर प्रश्नांची दाहकता निर्माण झालेली दिसते .पैसा हातात खेळू लागला ,मोबाईल, टीव्ही यांसारखे तंत्रज्ञान अक्षरशः युवा पिढीच्या अध: पतनाला कारण ठरू लागले .बेरोजगारी वाढली. भ्रष्टाचार फोपावला. स्वार्थी, स्वैराचारीवृत्ती ,गुन्हेगारीकरण , ढासळत चाललेली नैतिकता असे अनेक गंभीर प्रश्न त्यातून निर्माण झाले. विभक्त कुटुंब पद्धतीमुळे निर्माण झालेला एकाकीपणा, त्याचबरोबर संस्कार हीन युवा पिढी यांसारख्या प्रश्नांनी समाज हादरून गेला आहे. आजही या प्रश्नांना उत्तर , 'शिक्षण' आणि ' शिक्षण' हेच होय. युवा पिढीला संस्कारित करण्याचे आणि समाज परिवर्तन करण्याचे कार्य शिक्षणातून घडले पहिजे याची जाणीव महात्मा गांधीजींच्यां शिक्षण विषयक विचारांतून होते. म्हणूनच गांधीजींचे हे विचार कालातीत आहे असे म्हणावेसे वाटते.

शिक्षण या संकल्पनेचा विचार करता व्युत्पत्तीशास्त्रानुसार संस्कृत भाषेतील ' शास्' या धातूपासून शिक्षण हा शब्द आला आहे.'शास' याचा अर्थ ताब्यात ठेवणे नियंत्रित करणे. म्हणजेच शिकविण्याची शिस्त लावण्याची सूचना देण्याची प्रक्रिया होय.," शिक्षणास इंग्रजी भाषेत Education हा शब्द वापरतात. हा शब्द मूळ लॅटिन शब्द Educareवरून इंग्रजीत आला आहे.Educareम्हणजे तो bring up किंवा to draw out. व्यक्तीच्या ठाई जे सुप्त गुण आहेत. त्या गुणांना जागृत करून त्यांचा विकास करणे म्हणजे शिक्षण होय "१ ह्या शिक्षण विषयी गांधीजींचे विचार तत्त्वज्ञान स्वरूपाचे आहेत. त्यांचे शिक्षण विषयक विचारांचे चिंतन केल्यानंतर ते किती समाजाभिमुख आहेत याची जाणीव होते. त्यांनी देशी भाषा राष्ट्रभाषा यांचे महत्त्व विशद केले. बाल शिक्षण, स्त्री शिक्षण, प्रौढ शिक्षण, हरिजन शिक्षण ,उच्च शिक्षण, शारीरिक शिक्षण ,धार्मिक शिक्षण, लैंगिक शिक्षण अशा विविध शिक्षणाविषयक संकल्पनांवर सखोल विवेचन केले आहे .एवढेच नव्हे अभ्यासक्रम, शिस्त, शिक्षणाचे माध्यम आणि शिक्षण व्यवस्थेचा कणा असलेला शिक्षक इत्यादींबाबत आपले कालातीत त्यांनीविचार मांडले आहेत.१९३७मध्ये वर्धा येथे झालेल्या शिक्षण परिषदेत गांधीजींनी आत्मविश्वासपूर्वक असे उद्गार काढले होते की, " मी आज पर्यंत हिंदुस्तानला ज्या अनेक गोष्टी दिल्या आहेत. त्यात ही शिक्षण योजना पद्धती सर्वात मोठी गोष्ट आहे, आणि मला नाही वाटत की याहून अधिक चांगली अशी दुसरी कोणती गोष्ट मी राष्ट्र राष्ट्रास देऊ शकेन. " २ महात्मा गांधीजी केवळ ज्ञानवादी नव्हते, तर मानव जातीचा विचार करणारे एक तत्त्वज्ञ होते. जीवनाची आणि शिक्षणाचे फारकत होऊ शकत नाही. ह्या वास्तवाची जाणीव त्यांना होती. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रचंड प्रभावी साधन आहे .यावर त्यांचा विश्वास होता. या भावनेतून त्यांनी आपले शिक्षण विषयक विचार मांडले आणि आजही ते आपल्याला स्वीकार्य आहेत.

महात्मा गांधीजी शिक्षणाचा राष्ट्रीय पातळीवर विचार करीत होते. भारत देशाच्या तत्कालीन 40 कोटी जनतेच्या पोटाला भाकरी देणारे, हाताला उद्योग देणारे, एवढेच नव्हे तर त्यांना माणूस बनवणारे, त्यांना चारित्र्यसंपन्न बनविणारे शिक्षण अभिप्रेत होते. म्हणून महात्मा गांधीजी म्हणत की 'शिक्षण हे काही साध्य नाही तर ते साधन आहे.' ज्या शिक्षणाने आपण चारित्र्यवान बनू, तेच खरे शिक्षण मानता येईल. मात्र याबाबत ते म्हणतात, "आज-काल शाळांतून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाने हा परिणाम घडून येतो असे कोणी म्हणू शकणार नाही. शाळेत जाऊन चारित्र्य गमावून बसल्याची अनेक उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर आहेत. शिक्षणाचे सत्य स्वरूप विशद करताना गांधीजी म्हणतात,' ' 'शिक्षण म्हणजे परीक्षा देण्यासाठी केलेली हमाली असेच प्राय: मानले जाते आणि परीक्षा होता क्षणीच केलेला अभ्यास लवकरात लवकर विसरून जाण्याचा प्रयत्न केला जातो." ३ प्रस्तुत कडवट वास्तव आपल्या शिक्षण विषयक विचारातून गांधीजी मांडतात .या वास्तवाची प्रचिती वर्तमानात आल्या खेरीज राहत नाही. आजच्या काळात आयुष्यातील वीस एक वर्ष ज्ञान संपादन करण्यात जातात. नोकरी मिळते, मात्र व्यावसायिकनितींनीनीतीमत्ता जपली जाईल, याचे संवर्धन होईलच याची हमी मात्र कोणीही देऊ शकत नाही. वर्तमानपत्रातून त्यामुळेच आपल्याला उच्चशिक्षित सदस्य अधिकाऱ्याकडून झालेले भ्रष्टाचार, विनयभंग, बलात्कार यासांरख्या गोष्टी वाचायला मिळतात. शिक्षणाने माणूस सुशिक्षित होतोय .मात्र संस्कृत देखील झाला पाहिजे. हा गांधीजींचा कालातीत विचार आज आपल्याला चिंतन करायला लावतो. अनेक प्रश्न निर्माण करतो. म्हणून गांधीजींनी शिक्षणाने येणाऱ्या पांडित्यापेक्षा चारित्र्याला महत्त्व दिले. मानवतेचे सेवेचे महत्व स्पष्ट केले, जो समाज सुशिक्षित झालेला आहे त्याच्यात परिवर्तन हे

होणारच, झाले पाहिजे असा आशावाद व्यक्त करतात. शिक्षणातून माणूस निर्माण झाला पाहिजे. अशी आग्रही भूमिका महात्मा गांधीजी घेतात. माणुसकीची पाठ देणारी मंदिरे म्हणजे शाळा होत. या संदर्भात त्यांचे तत्त्वज्ञान उच्च कोटीचे आहे, "मनुष्य मनुष्यांतील संबंध हे विश्वासाचे व्हावेत. भीतीवर ते आधारलेले नसावेत. कारण गांधीजींची मूळनिष्ठा ही की, मनुष्य स्वभावताच चांगला आहे मानवी अंतकरणातील निसर्गदत्त चांगुलपणा ही त्यांच्या विचारांची मूळ शीला आहे .म्हणून मनुष्य केवळ सुशिक्षित असून चालणार नाही .तर तो संस्कृत व चारित्र्यसंपन्न असला पाहिजे. म्हणून जे शिक्षण अशा चारित्र्याची निर्मिती करू शकते तेच सर्वोच्च शिक्षण होय "४

शिक्षणाने शरीर आणि मनाचा विकास झाला पाहिजे. त्याकरिता अधिक परिश्रम घेतले गेले पाहिजेत. आत्म्याचा विकास करताना धार्मिक पुस्तकांचा आधार घेतला गेला पाहिजे. प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या धर्माची मूलतत्त्वे माहिती असली पाहिजेत. स्वतःच्या धर्मग्रंथांचे तत्त्वज्ञान, त्यातील विचार यांचे किमान ज्ञान असले पाहिजे. अशी धारणा महात्मा गांधीजींची होती. त्यामुळे टॉलेस्टॉय आश्रमात यथाशक्ती या सर्वांची व्यवस्था त्यांनी केली होती. आत्म्याचे शिक्षण हा ते स्वतंत्र विषय मानतात, "आत्म्याचा विकास करणे म्हणजे शील बनविणे. ईश्वराचे ज्ञान मिळवणे, आत्मज्ञान प्राप्त करून घेणे. हे ज्ञान मिळवण्यासाठी मुलांना खूपच मदत पाहिजे आणि त्याखेरीज इतर ज्ञान व्यर्थ आहे आणि हानिकारकही होण्याचा संभव आहे. असे मला वाटत होते,"५ असे 'सत्याचे प्रयोग' या आपल्या आत्मकथनांमध्ये ते व्यक्त होतात.

महात्मा गांधीजींना स्वातंत्र्याबरोबर शैक्षणिक व सांस्कृतिक विषमता दूर करायची होती आणि सुशिक्षित समाज निर्माण करायचा होता. त्यासाठी त्यांनी शिक्षणाची गरज व्यक्त केली. मात्र यासाठी आवश्यक शिक्षण माध्यम यावर देखील ते आपले विचार प्रकट करतात. "आमचे शिक्षण पूर्णपणे विदेशी आहे. राष्ट्रीय शिक्षणापासून सर्व काही व्यर्थ आहे .स्वराज्य आज मिळेल वा उद्या मिळेल, पण राष्ट्रीय शिक्षणावाचून ते टिकू शकणार नाही. "६ असे ठाम त्यांचे मत होते. त्याकरिता शिक्षण मातृभाषेतून दिले पाहिजे अशी त्यांची भूमिका होती. ज्या वयामध्ये कुतूहलता, नवीन शिकण्याची उमेद, जिज्ञासा बालकांमध्ये असते. त्या वयात त्याची सर्व शक्ती परकीय भाषा शिकण्यात वाया जाते. त्यामुळे अनेक वेळा आनंदी. शिक्षणाऐवजी बालक शिक्षणाचा तिटकारा करू लागते. याकरिता मातृभाषेतील शिक्षणाचा महात्मा गांधीजी पुरस्कार करतात. शिक्षण आणि घरची परिस्थिती या दोहोत मेळ असावा. अनेक लोकांच्या गरजा पूर्ण करणारे शिक्षण असावे. समाजाच्या परिवर्तनाची जेव्हा अपेक्षा आपण बाळगतो. त्यावेळेस हे परिवर्तन करणारे शिक्षण मोफत मिळाले पाहिजे .त्याचबरोबर सगळ्यांना मिळाले पाहिजे. अशी भूमिका महात्मा गांधीजी घेतात.'' गांधीजींनी इंग्रजी भाषा किंवा तिच्या अव्वल दर्जाचे साहित्य यांचा कधीही द्वेष केला नाही मात्र ,जे मूल आईच्या मुखातून बाहेर पडणारा शब्दातून जीवनाचा पहिला पाठ शिकते. त्याच्यावर परकीय भाषा लादने पाप होय असे गांधीजींना वाटते. म्हणून इंग्रजी माध्यम असणारी शिक्षण पद्धती चुकीची आहे असे गांधीजींचे स्पष्ट मत होते. ज्या पद्धतीने इंग्रजी शिक्षण देण्यात आले आहे. त्या पद्धतीने सुशिक्षित भारतीयांना नि:सत्व पुरुषार्थहीन बनविले आहे. भारतीय विद्यार्थ्यांच्या मानसिक शक्तीवर तिचा खूप ताण पडला आहे आणि तिने आम्हाला केवळ अनुकरण शील बनविले आहे. देशी भाषांचे क्रमशः उच्चाटन हे एक भारतीय ब्रिटिश संबंधाच्या इतिहासातील अत्यंत दुःखद प्रकरण आहे." ७

महात्मा गांधीजींना वयाच्या बारावी वर्षापर्यंत शिक्षण मिळाले ते त्यांच्या मातृभाषा असलेल्या गुजरातीतून. मात्र त्यानंतरच्या पुढील शिक्षणात इंग्रजी जबरदस्ती त्यांना सहन करावी लागली. गणित, विज्ञान ,इतिहास ,भूगोल यांसारख्या विषयांबरोबर संस्कृत, फारशी देखील चक्क इंग्रजी माध्यमातून शिकवली जायची. इंग्रजीच्या जडत्वामुळे त्यांना जास्तीचा काळ लागला. त्यामुळे महात्मा गांधीजींनी शिक्षणाच्या माध्यमातून बोलत असताना स्वभाषेचा आग्रह धरलेला दिसतो. हा आग्रह करीत असताना इंग्रजी भाषेची सक्ती करू नये. मात्र ती ऐच्छिक असावी असे त्यांना वाटे. कारण इंग्रजी भाषेच्या अभ्यासाने बाहेरून जगाची संस्कृतीचे ज्ञान होते. त्याची जाणीव त्यांना होती विद्यापीठ या शिक्षणातून राष्ट्रभक्तांची फौज निर्माण झाली पाहिजे असे महात्मा गांधीजी विचार मांडतात. आपल्या विद्यापीठ ज्ञानाचा केवळ रोजगारासाठी उपयोग होता कामा नये. तर समाज उपयोगी, देश उपयोगी गोष्टींसाठी विद्यापीठ ज्ञान कामी आले पाहिजे. नव संशोधन वृत्तीतून नाविन्याची कास धरली पाहिजे. आपल्या राष्ट्रीय गरजा ओळखून विद्यापीठ शिक्षणात अमुलाग्र बदल बदलांची गरज त्यांनी स्पष्ट केली. औद्योगिक क्षेत्राला आवश्यक कला कौशल्याने निपुण विद्यार्थी निर्माण करण्याची जबाबदारी विद्यापीठ शिक्षणाची असली पाहिजे. त्याकरिता विद्यापीठ अभ्यासक्रम आवश्यक बदल

महात्मा गांधीजी सुचवतात. पोषक अभ्यासक्रम कसा असावा याबाबत मार्गदर्शन करतात .अशी विद्यापीठे देशाची भूषण आहेत असे त्यांचे मत होते.

महात्मा गांधीजींनी व्यायामाचे महत्त्व ओळखले होते . त्याला शिक्षणात महत्त्वाचे स्थान दिले. सुदृढ शरीरात सुदृढ मन वास करीत असते. त्यामुळे व्यायाम खूप महत्त्वाचा आहे. शाळेमध्ये शारीरिक शिक्षण सक्तीचे केले पाहिजे या गोष्टीवर गांधीजींनी विशेष भर दिला.व्यायामा बरोबरमहात्मा गांधीजींनी शिस्तीला सुद्धा महत्व दिले . शिस्तीचे केवळ शालेय जीवनातच नव्हे, तर जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये शिस्तीची फार मोठी गरज आहे. शिस्त ही जेवढी आवश्यक आहे तेवढीच ती फायद्याची आहे. ती सर्वांसाठी सारखीच असावी. त्यात लहान मोठ्यांचा भेद नसावा. विद्यार्थ्यांचे विचार आणि भावना यावर जेव्हा शिक्षकाचे शुद्ध विचार आबादित राज्य करीत असतात, त्यावेळेस बेशिस्तीचा प्रश्न उद्भवत नाही. अशी महात्मा गांधीजींची खात्री होती. आयुष्याला वळण लावायचे असेल तर शिस्तीची नितांत गरज आहे गरज आहे. उत्साही तरुण जेव्हा कुठलीही कारण न सांगता स्वतःची जबाबदारी स्वतः स्वीकारून कामे पूर्ण करण्याची सवय लावून घेतात तेव्हा त्यांना शिस्त कळलेलीअसते ,"अगदी कडकआणि पोलादी शिस्त असल्याशिवाय आपल्याला भव्य दिव्य आणि शाश्वत असे काहीही साध्य करता येणार नाही. एक महान राष्ट्र बनविण्याची आकांक्षा उराशी जतन करणाऱ्यांसाठी सामूहिक त्या आवश्यक बाब आहे"८ म्हणूनच विद्यार्थ्यांना शाळेत शिस्त लागली नाही तर त्यांच्या शिक्षणावर केलेला खर्च आणि वेळही व्यर्थ आहे असे विचार गांधीजी मांडतात. अशाप्रकारे महात्मा गांधीजींचे शैक्षणिक विचार आजच्या काळात सुद्धा महत्त्वपूर्ण ठरतात. १९८६ मध्ये राष्ट्रीय धोरण अस्तित्वात आले. त्यानंतर आज २४ वर्षानंतर नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ( National Education Policy )चीअंमलबजावणी सुरू झाली आहे. या धोरणातील शैक्षणिक तरतुदींचा विचार केला तर आपणास असे जाणवते की, या धोरणामध्ये देखील महात्मा गांधीजींच्या शैक्षणिक विचारांची बीजे पेरले गेली आहेत . महात्मा गांधीजींनी मांडलेले मातृभाषा, व्यवसाय कौशल्य, राष्ट्रभक्ती, चारित्र्य संवर्धन, यांसारख्या अनेक बाबी आज काळाची गरज म्हणून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात स्वीकारलेल्या आहेत. म्हणूनच आज महात्मा गांधीजींच्या शैक्षणिक विचारांची गरज स्पष्ट होते. हे विचार कालातीत आहेत हे सिद्ध होते.

**समारोप :** महात्मा गांधीजींनी शिक्षण विषयक विचारांमध्ये देशी भाषा,राष्ट्रभाषा,बालशिक्षण, स्त्री शिक्षण, उच्च शिक्षण,शारीरिक शिक्षण अशा शिक्षणाच्या अनेक अंगांचे चिंतन केले आहे. शिक्षणाने माणूस घडला पाहिजे. त्याचे चारित्र्य घडले पाहिजे .केवळ रोजगार देणे शिक्षणाचे काम नाही. तर सामाजिक बांधिलकीतून, राष्ट्रीय प्रेमातून शिक्षणाने नवी पिढी घडली पाहिजे.या शिक्षणाला शारीरिक शिक्षणाची आणि शिस्तीची गरज आहे. शिक्षणातून व्यक्ती विकासाबरोबर राष्ट्राचा विकास झाला पाहिजे.अशी भूमिका महात्मा गांधीजी घेतात. त्यांची भूमिका शिक्षण विषयक विचार कालातीत आहे हे स्पष्ट होते.

**संदर्भ :**

१) डॉ करंदीकर सुरेश, मंगरूळकर मीना, 'उदयोन्मुख भारतीय समाजातील शिक्षण', फडके प्रकाशन, कोल्हापूर,द्वितीय आवृत्ती २००२, पृष्ठ ७

२) शिखरे दा.न .(संपा), 'गांधीजींचे शिक्षण विचार', ए.रा.घोंगडे, महात्मा गांधी गौरव ग्रंथ, प्रकाशन १९६९, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी, पुणे, ८, पृष्ठ २६७

३) महात्मा गांधी गौरव ग्रंथ, तत्रैव, पृष्ठ २६९

४) भगत रा. तु, 'शिक्षणातील थोर विचारवंत', चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, तृतीया वृत्ती, २००९, पृष्ठ १०१

५) गांधी, मो. क., 'सत्याचे प्रयोग' अनुवाद, सी. पु. पटवर्धन, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद ,१४ ,बाविसावी आवृत्ती, २००९, पृष्ठ ३२३

६) पाटील बी.बी, 'भारतीय राजकीय विचारवंत', फडके बुक प्रकाशन, कोल्हापूर, जून २००२, पृष्ठ १३८,

७) शिक्षणातील थोर विचारवंत, उनि. पृष्ठ १०८

८) तत्रैव, पृष्ठ १२८